# सातारा जिल्हा परिषद, सातारा

## सामान्य प्रशासन विभाग

कार्यालयाचा पत्ता :- जिल्हा परिषद मुख्य इमारत, ४ था मजला,सातारा-कोरेगांव रोड, सदर बझार
कँम्प.ता.जि.सातारा – ४१५००१

कार्यालय दूरध्वनी क्र. ०२१६२ - २९५०५३ Email- dyceogadstr@gmail.com


## घोषणापत्र

महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रं.जिपब-४१४ /प्र.क्र. ११२/आस्था -१४ दिनांक १५/०५/२०१४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सातारा असे घोषीत करतो की, जिल्हा परिषदेकडील गट -क व गट -ड मधील विविध संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या प्रशासकिय व विनंती बदल्या बाबतचे शासन धोरणानुसार प्राधान्य क्रमानुसार बदल्यांची प्रक्रिया पार पाडत असताना पात्र कर्मचा-यांची सेवा वास्तव्य जेष्ठता यादी जिल्हा परिषदकडील सातारा जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्राधान्य क्रमाने बदली प्रक्रिया करण्यात येत आहे. मात्र उपरोक्त शासन निर्णयामधील भाग 2(2) नुसार जागा भरण्याची कार्यवाही केल्यांनतर उर्वरित तालुक्यांतील रिक्त पदे भरताना भरलेल्या पदांचा प्रत्येक तालुक्यात समतोल राखण्यात यावा अशा सुचना आहे.तसेच भाग 4 (ड) ज्या भागात / तालुक्यात सर्व पदे भरणे आवश्यक आहे. ती वगळता उर्वरित तालुक्यातील समतोल साधला जाईल याची दक्षता घेणे बाबत सुचना आहेत.

सबब ज्या विभागात / तालुकयात एकूण पदाच्या समानिकरणानुसार कमी पदे कार्यरत आहेत, अशा विभागात / तालुकयातील कर्मचा-यांची विनंती बदली कार्यरत पदांचा समतोल राखण्यासाठी मान्य करता येणार नाहीत.

जिल्हा स्तरावरील व तालुका स्तरावरील समानीकरणानुसार आवश्यक ती रिक्त पदे दाखविण्यात आलेली आहेत.सदरची यादी सातारा जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

त्यानुसार बदली बाबतची अंमलबजावणी करण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी.

जा.क्र.साजिप/आस्था 2(5)/ 4088 / 2021
सातारा जिल्हा परिषद सातारा
दिनांक 19 .07.2021

(विनय गौडा जी.सी) भा.प्र.से
मुख्य कार्यकारी अधिकारी
सातारा जिल्हा परिषद,सातारा

प्रत माहितीसाठी सविनय सादर

1. मा.अध्यक्ष मा. उपाध्यक्ष,मा. विषय समिती सभापती जिल्हा परिषद,सातारा यांना माहितीसाठी सादर.
2. सर्व खातेप्रमुख जिल्हा परिषद,सातारा, सदरचे घोषणापत्र बदली पात्र कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे.
3. सर्व गटविकास अधिकारी पंचायत समिती, सदरचे घोषणापत्र बदली पात्र कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे.

Scanned with CamScanner